

# भारताकडून चोख प्रत्युत्तर, पाकिस्तानातील लाहोरमध्ये ड्रोन हल्ला

## पाकिस्तानला मोठा झटका, दोन JF- 17, एक F-16 पाडलं

OPERATION SINDOOR


परळी संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

https://www.parlisangharshneta.in


बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 119 | शुक्रवार दि. 09 मे 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# पाकिस्तानने भारतीय लष्करी तळांना लक्ष्य केल्यामुळेच लहारोमधील रडार उद्ध्वस्त",



२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने ७ मे रोजी मध्यरात्री पाकिस्तानच्या दहशतवादी तळावंर हल्ले केले. या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेल्याचा दावा भारताकडून करण्यात येतोय. दरम्यान, आजही भारत आणि पाकिस्तानाने एकमेकांवर हल्ले केले. हे हल्ले पाकिस्तानने केलेल्या हल्ल्याचं प्रत्युत्तर असल्याचं भारताने स्पष्ट केलं आहे. आजही परराष्ट्र मंत्रालयाकडून पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी विंग कमांडर व्योमिका सिंग, कर्नल सौफिया कुरेशी यांनी आजच्या दिवसभराची माहिती दिली.ाकिस्तानने उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी तळांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्यानंतर लाहोर येथील हवाई संरक्षण प्रणाली निष्क्रिय करण्यात आल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

"७ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर'बाबतच्या पत्रकार परिषदेत भारताने आपला प्रतिसाद केंद्रित, संतुलित आणि गैर उत्तेजक असल्याचं म्हटलं होतं. तसंच, यावेळी पाकिस्तानी लष्करी आस्थापनांना लक्ष्य



करण्यात आले नव्हते. पण भारतातील लष्करावर कारवाई झाल्यास योग्य पान 3 वर

## पाकिस्तानला मोठा झटका, दोन JF- 17, एक F-16 पाडलं

पाकिस्तानने पुन्हा एकदा हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे दोन JF- 17 आणि F-16 फायटर जेट पाडल्याची माहिती आहे. पाकिस्तानने काल रात्री भारताच्या 15 शहरांवर मिसाईल आणि ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला होता. पण हा प्रयत्न भारताने यशस्वी होऊ दिला नाही. S-400 एअर डिफेन्स सिस्टिमने पाकिस्तान हवाई हल्ला परतवून लावला. त्यानंतर पाकिस्तानने पुन्हा एकदा जम्मूमध्ये ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न सुद्धा भारताच्या सैन्यदलाने यशस्वी होऊ दिलेला नाही. पाकिस्तानने डागलेली ड्रोन आणि मिसाईल्स हवेतच नष्ट करण्यात आली आहेत. भारतीय एअर डिफेंस सिस्टिमने जम्मू, जैसलमेर आणि अमृतसर येथे पाकिस्तानचे हल्ले अयशस्वी केले आहेत. एअर डिफेन्स सिस्टिमसह एअर डिफेन्स गनने सुद्धा जम्मूत कमी उंचीवरुन उडुणाऱ्या ड्रोन्सना नष्ट केलं. जम्मू काश्मीर सरकारकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे. घरातील कोणत्याही लाइट चालू करु नका. वाहनांची रस्त्यावरील हालचाल थांबवा. घराबाहेर पडू नका, असं जम्मू काश्मीर सरकारकडून आवाहन करण्यात आलं आहे.

नवी दिल्ली : ऑपरेशन सिंदूरमुळे बिथरलेल्या पाकिस्तानने आगळीक केली असून त्याने भारतावर ड्रोन हल्ले केले. जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, पंजाबमधील होशियारपूरवर पाकिस्तानने ड्रोन हल्ला केला. पाकिस्तानच्या हल्ल्यानंतर या ठिकाणी ब्लॅकआऊट करण्यात आलं असून भारताची डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाली आहे. भारताने पाकिस्तानचे अनेक ड्रोन पाडल्याची माहिती समोर आली आहे. जम्मूतील विमानतळ हे पाकिस्तानचे लक्ष्य होतं अशी माहिती समोर येत आहे.

गुरुवारी रात्रीच्या वेळी भारताच्या हद्दीतील जम्मू शहरात पाकिस्तानच्या ड्रोनचा हल्ला सुरु झाला. त्यानंतर जम्मूमध्ये ब्लॅकआऊट करण्यात आले आणि सायरन वाजवून लोकांना सावध करण्यात आलं. त्यानंतर या प्रदेशाचा ताबा लष्कराने घेतला. दरम्यान, भारताची डिफेन्स सिस्टिम एस 400 सक्रिय झाली आणि त्या माध्यमातून भारताने पाकिस्तानचे अनेक ड्रोनला हवेतच लक्ष्य केलं

## जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, होशियारपूरवर पाकिस्तानचा ड्रोन हल्ला; भारताचाही प्रतिहल्ला

- 8 ड्रोनसह पाकचं एफ-16 मिसाईलही पाडलं
- गेल्या 40 तासांत मोठ्या हालचाली
- भारताने पुरावे दाखवत पाकिस्तानच्या खोटारडेपणाचा बुरखा फाडला


## "सतर्क राहा, समन्वय ठेवा", Operation Sindoor नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मंत्रालयांना आदेश



पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारने पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू काश्मीरच्या दहशतवादी तळांवर हल्ला घडवून आणला. या हल्ल्यात 100 हून दहशतवाद्यांचा खात्मा झाल्याचा दावा भारत सरकारकडून करण्यात येतोय. दरम्यान, बुधवारी मध्यरात्री हा हल्ला झाल्यानंतर गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकारी विभाग आणि मंत्रालयांच्या सचिवांबरोबर उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत सर्व विभागांना एकमेकांशी समन्वय साधण्याचे आदेश देण्यात आले आहेत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

पंतप्रधांनांनी सचिवांबरोबर घेतलेल्या बैठकीत नागरी संरक्षण यंत्रणा मजबूत करणे, चुकीची माहिती आणि बनावट बातम्यांना आळा घालण्याचे प्रयत्न आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांची सुरक्षा सुनिश्चित करणे हे विषय चर्चेत आले होते. पंतप्रधान कार्यालयाच्या निवेदनानुसार, मोदींनी मंत्रालयांमध्ये समन्वय ठेवण्याचे आवाहन केले आणि त्यांना राज्य अधिकारी आणि तळागाळातील सरकारी संस्थांशी समन्वय साधण्यास सांगण्यात आले आहे.

# "अल्लाह, तूच रक्षण कर..", संसदेतच रडू लागला पाकिस्तानचा खासदार;



## 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाचावर धारण!

"अल्लाह, तूच रक्षण कर..", संसदेतच रडू लागला पाकिस्तानचा खासदार, 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाचावर धारणा (फोटो सौजन्यः सोशल मीडिया) इस्लामाबादः भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान भांबरला आहे.

भारताने पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्या 28 निष्पाप नागरिकांच्या हत्येचा अखेर बदला घेतला आहे. भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर मोहीमेअंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या ठिकाणांना उद्ध्वस्त केले आहेत. यानंतर पाकिस्तान चांगलाच गोंधळात पडला आहे. याच दरम्यान पाकिस्तानच्या राष्ट्रीय सभेत एक खासदार भीतीने रडू लागले आहेत. सध्या याचा व्हिडिओ सोशल मीडियावर पाहायला मिळत आहे. पाकिस्तान मुस्लिम लीग-एन चे खासदार ताहिर इक्बाल पाकिस्तानच्या संसदेत रडू लागले. पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या पक्षाचे ते खासदार आहेत. त्यांनी म्हटले की, अल्लाह आपले रक्षण करो. व्हिडिओमध्ये तुम्ही पाहू शकता की, पाकिस्तानच्या पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या पक्षाचे खासदार रडताने दिसत आहेत. त्यांनी म्हटले आहे ती, आता, अल्लाहच आपली रक्षा करेल, अल्लाह तूच आमचे संरक्षण कर. दरम्यान भारताच्या ऑपरेशन सिंदूरच्या कारवाईनंतर पाकिस्तानने भारताच्या 15 पान 3 वर

# अंजुमन उल उलुम कन्या माध्यमिक शाळा मुलींना 11 वी सायन्स इंग्रजी मध्यम साठी उच्च माध्यमिक वर्गास प्रवेश देणार






## शासनाकडे आवश्यक प्रस्ताव शक्षणिक धोरण 2020 अंतर्गत सादर-बहादुर भाई

परळी वैजनाथ दि.08 (प्रतिनिधी) शहरातील नामांकित अंजुमन शिक्षण संस्थेच्या अंजुम उल उलूम कन्या माध्यमिक शाळा उच्च माध्यमिक शाळेचे वर्ग 2025- 26 या वर्षापासून 11 वी इंग्रजी माध्यमाच्या सायन्स वर्ग सुरु करणार असून त्या साठी आवश्यक मान्यता नवीन शैक्षणिक धोरण 2020 अन्वे प्रस्ताव सादर करून रीतसर विद्यार्थिनींना 11 वी साठी प्रवेश देण्यात येणार असून विद्यार्थीनी अंजुम उल उलूम कन्या उच्च माध्यमिक शाळेत प्रवेश साठी अर्ज करावा असे आवाहन बहादुर भाई यांनी केले आहे.

शहरातील नामांकित अंजुमन शिक्षण संस्थेच्या अंजुम उल उलूम कन्या माध्यमिक शाळेत आजपर्यंत 10 वी पर्यंत मुलींना शिक्षण घेता येत होते. 11 वी, 12 वी साठी इतरत्र प्रवेश घ्यावा लागत असे. पालकांच्या आग्रह नुसार मात्र चालू शैक्षणिक वर्षापासून शासनाच्या शिक्षण विभागाच्या वतीने अंजुम उल उलूम कन्या माध्यमिक शाळेस उच्च माध्यमिक म्हणजे येणाऱ्या 25 -26 या शैक्षणिक

वर्षा पासून मुलींना 11 वी सायन्स इंग्रजी माध्यमासाठी शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे. यामुळे अंजुम उल उलूम कन्या शाळेत प्राथमिक पासून ते उच्च माध्यमिक पर्यंत एकाच ठिकाणी मुलींचे शिक्षण पूर्ण करता येणार आहे. यावर्षीच्या म्हणजे जून पासून सुरु होणाऱ्या 25-26 शैक्षणिक वर्षा पासून हि प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. अंजुम उल उलूम कन्या उच्च माध्यमिक शाळेत 11 वी साठी विद्यार्थिनींनी प्रवेश साठी नाव नोंदवावे असे आवाहन बहादुर भाई यांनी केले आहे.



• बीड - भाजपाचे ज्येष्ठ नेते शेख जमादार यांच्या तब्येतीची विचारपूस करण्याकरता भाजपाच्या उपाध्यक्ष दबंग मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे आल्या असता त्यांचा सत्कार करताना भाजपा संस्थापक सदस्य नोटरी अ‍ॅड. राहुलकुमार राका, खळेगाव येथील माजी प.स.उपसभापती अशोकराव शिंदे, भाजपा युवा नेते डॉ. शेख ईब्राहिम , महेश नागरे, बाबासाहेब घोडके , विनोद राठोड आदि भाजपा कार्यकर्ते दिसत आहेत.

# पाईपलाईन फुटीचे प्रकार थांबवून पाणीपुरवठा सुरळीत करावा ; अश्विन मोगरकर



परळी वैजनाथ प्रतिनिधी महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे परळी शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याने गणेशपार सह गावभागात आठ दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. वारंवार होणाऱ्या पाईपलाईन फुटीच्या घटना त्वरित थांबवून किमान उन्हाळ्यात तरी पाणीपुरवठा सुरळीत रहावा व पाईपलाईन फोडणार्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी भाजपा पदाधिकारी अश्विन मोगरकर यांनी मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांच्याकडे केली आहे.

परळी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वाण धरणात मुबलक पाणीसाठा असूनही नियोजना अभावी व वारंवार होणाऱ्या पाईपलाईन फुटीमुळे नागरिक पान 3 वर

# केवळ प्रतापच महाराणा

नऊ मे पंधराशेचाळीस रोजी उदयसिंह आणि जवयवंतीबाई यांचे पोटी महाराणा प्रतापांचा जन्म झाला. राणासांगा महाराणा प्रताप चे आजोबा होते आणि बाप्पा रावल पंजोबा होते.राणा कुंभांच्या सिसोदिया वंशात राणांचा जन्म झाला होता. अकबराला मेवाड जिंकण्याची अत्यंत महत्त्वाकांक्षा होती, कारण मेवाडची जमीन अत्यंत उपजावू आहे,तेथे विविध खनीजांच्या खाणी आहेत, गुजरातशी व्यापार करायचा तर मेवाड ताब्यात पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या पराक्रमी वंशात जन्मलेल्या महाराणा प्रतापास अंकित केले असते तर खऱ्या अर्थाने अकबर चक्रवर्ती सम्राट समजला जाऊ शकला असता. अकबर महाराणा प्रतापांना म्हणाला होता की अर्ध्या हिंदुस्थानचे राज्य तुला देतो,तू मझा अंकित म्हणून रहा आणि फक्त मेवाडंच मला दे.एकदा अकबराच्या दरबारात अशी अफवा झाली होती की महाराणा प्रताप शरण येणार. त्यावेळी अकबराच्या दरबारी असलेल्या पृथ्वीराज राठोडला ही बातमी सांगितली. यावेळी पृथ्वीराज राठोडने राणा प्रतापांना एक पत्र लिहिले आणि त्यात त्याने याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. राणप्रतापाने पृथ्वीराज राठोडास असे पत्र लिहिले की हे कदापि शक्य होणार नाही. रानावनात राहून आणि गवताच्या भाकरी खाऊन जो राणा प्रताप राहतो तो असा शरण येईल असे आपणास वाटलेच कसे.

हळदीघाटच्या युद्धामध्ये विजय कुणाचाच झाला नव्हता अकबराचाही नाही आणि राणा प्रतापाचाही नाही. हळदी घाटाच्याच जमिनी महाराणा प्रतापाने दान दिल्याचे लेखी पुरावे आहेत. हळदी घाटचे युद्ध महाराणा जिंकत आले होते. अकबराचे सैन्य मागे वळून पळत सुटले होते पण तितक्यात अकबराच्या एका सरदाराने अफवा उठवली की अकबर स्वतः सैन्य घेऊन हळदीघाटावर येत आहे आणि मागे वळून पळत जाल तर अकबर स्वतः तुम्हाला कापून काढील, त्यापेक्षा राणा प्रतापाबरोबर लढून मरा.मग मोगल सैन्य वापस फिरले आणि पुन्हा घनघोर युद्ध झाले. या युद्धात महाराणा प्रतापाचा चेतक घोडा मानसिंगा समोर आला आणि त्याने समोरचे दोन्ही पाय मानसिंगाच्या हत्तीच्या मस्तकावर ठेवले, त्याचवेळी राणा प्रतापाने मानसिंगावर एक भाला फेकून मारला, तो भाला मानसिंगाच्या माहुताला लागून तो मृत झाला. मानसिंग हात्ती वरुन खाली घोड्यावर आला म्हणून वाचला. मानसिंगाच्या हत्तीच्या सोंडेमध्ये एक तलवार होती, ती महाराणा प्रतापाच्या चेतकच्या मागच्या पायावर लागली, आणि चेतक घायाळ झाला. मुर्छित असलेल्या महाराणा प्रतापांना त्यांच्या झाला नावाच्या सरदाराने सैन्याच्या बाहेर काढून दिले. रस्त्यातील 28 फुटाच्या एका नाल्यावरुन चेतकने अलगद उडी घेतली, आणि महाराणांना वाचवले. चेतक खाली कोसळला आणि महाराणा प्रताप अत्यंत दुःखी होऊन अश्रू ढाळू लागले. महाराणा प्रतापांचा शक्तीसिंह नावाचा भाऊ मोगलांच्या सैन्यात होता व तो पाठलाग करीत महाराणांच्या मागे आला. तिथे आल्यानंतर मात्र तो महाराणांना मिळाला. महाराजांच्या सैन्यात रामप्रसाद नावाचा एक लढाऊ हत्ती होता अकबराच्या बऱ्याच हत्तींना त्याने मारले होते. अकबर म्हणाला होता की मला कसेही करून तो रामप्रसाद हत्ती आणून द्या. अकबराच्या बारा हत्तींनी रामप्रसादला वेढा घालून त्याला जेरबंद केले. अकबराच्या सैन्याने रामप्रसादला त्यांच्या हत्तीखान्यामध्ये नेले पण रामप्रसादाने तिथे खाणे पीणे वर्ज्य केले आणि प्राण त्याग केला. असे होते राणा प्रतापांच्या सेनेतील हत्ती आणी घोडे. प्रभू रामचंद्रांचे सैन्य जसे वानरांचे होते, श्रीकृष्णाचे सवंगडी जसे गोपाळ होते किंवा शिवरायांच्या सैन्यात जसे मुसलमान आणिअठरापगड जातीचे मावळे होती त्याचप्रमाणे महाराणा प्रतापांच्या सैन्यात भिल्ल लोहार आदिवासी आणि पठाण, असे विविध जाती जमातींचे लोक होते. महाराणा प्रताप यांच्या सैन्यास भामाशहा आणि त्यांचा भाऊ ताराचंद यांनी पंचवीसहजार सैन्यासाठी बारा वर्षे पगारासाठी पुरेल एवढी संपत्ती दिली होती. महाराणा प्रतापांनी त्यांची पंतप्रधान म्हणून नेमणूक केली होती. अशा पद्धतीने व्यापारी आणि मागासवर्गीयांनीच महाराणा प्रतापांना मोलाचे सहकार्य केले होते. आणि शिवाजी महाराजांप्रमाणे स्वकीयच त्यांच्या विरोधात लढले होते. भारत देशाला हा मोठा शापच आहे असे दिसते. इतिहासात असे सामान्य लोकांनीच स्वाभिमानी राजांना विजय मिळवून दिले.हाकीम खान नावाचा त्यांचा एक शूर सरदार होता. त्यानेच मूर्छित राणा प्रतापांना मोगलांच्या वेढ्यातून बाहेर काढले होते. राजपूत राजांपैकी केवळ महाराणा प्रतापांनीच शिवाजी महाराजां प्रमाणे गनिमी काव्याचे महत्त्व जाणून ते अरावली पर्वताच्या रांगेत राहून शत्रूशी लढताना गनीमी काव्याचा उपयोग करत होते.

महाराणांनी मोगलांच्या ताब्यातील बत्तीस किल्ले परत जिंकून घेतले होते मेवाडचा बराच भाग जिंकून घेतला होता फक्त चित्तोड किल्ला त्यांना जिंकता आला नाही याचीच त्यांना खंत होती. हळदी घाटची लढाई आपणा सर्वांना ठाऊक असते पण दिवेर ची लढाई अत्यंत महत्त्वाची होती ती महाराणा प्रतापांनी जिंकली होती आणि त्यामध्ये महाराणा प्रताप यांचा मुलगा अमरसिंह याने सुलतान खान नावाच्या सरदाराला भाल्याच्या सहाय्याने मारले होते. तो भाला सुलतानखानाच्या शरीरातून आरपार गेला होता. त्यावेळी अमरसिंह केवळ सतरा वर्षाचा होता. त्या काळात शत्रू पण पराक्रमाचे कौतुक करीत. सुलतानखानाने अमरसिंहाचे मरतेवेळी कौतुक केले होते.

राणाप्रतापांना मनवण्यासाठी भगवानदास, तोडरमल, मानसिंग वगैरे बऱ्याच सरदारांनी प्रयत्न केले. पण स्वाभिमानी राणा प्रताप कधीच तयार झाले नाहीत.

अब्दुल रहमान खान खान नांवाचा सरदार एकदा महाराणा प्रतापांवर आक्रमण करण्यासाठी अकबराने पाठवला होता. त्यावेळी महाराणाचा पुत्र अमरसिंहाने खान खानाचा पराभव करून त्याच्या बायको मुली सुनांना महाराणांसमोर उभे केले होते, त्यावेळी महाराणा ने अमरसिंहाची कान उघाडणी करुन त्या सर्व स्त्रियांना साडी चोळी करुन सन्मानाने खानखानाकडे पाठवले होते. खानखानाने महाराणांचे कौतुक केले आणि तो म्हणाला की आम्ही पंचेवीस वर्षे तुमच्यावर सतत हल्ले करत आलो तरी तुम्ही आमच्याशी इतक्या चांगल्या पद्धतीने वागलात. चंद्र सूर्य आहे तोपर्यंत ही तुमचा वंश संपणार नाही.

महाराणा च्या मृत्यूची बातमी व हरभऱ्याला समजली त्यावेळी अकबराच्या डोळ्यात अश्रू जमा झाले. आणि अशा स्वाभिमानी राजाला मी त्रिवार वंदन करतो पाहिला असे तो म्हणाला.



**डॉ.सुरेशचंद्र चौधरी.**
**8605434945.**

# सुवर्ण कार सर्व शाखीय वधु , वर परिचय मेळावा



**श्री संत नरहरी महाराज आम्ही सुवर्णकार मंडळ. यांच्या माध्यमातून आम्ही महिला आयोजित.सुवर्णकार सर्व शाखीय परिचय मेळाव्याचे आयोजन. नाशिक येथे 18 मे रोजी करत आहोत.सुवर्णकार सर्व शाकीय परिचय मेळाव्याचे आयोजन आम्ही सुवर्णकार महिला करत आहोत महिला अध्यक्षा गीता नवसे तसेच समाजभूषण मीनाताई सोनार, समाजभूषण विजाताई दहिवाळ,अनिताताई शहाणे.व आमची सर्व महिला टीम मिळून.आम्ही आयोजन करत आहोत. ठिकाण - लक्ष्मीनारायण मंदिर, शनी मंदिर समोर, जेल रोड, नाशिक येथे.वेळ - सकाळी साडेदहा ते पाच पर्यंत.दिनांक 18 मे 2025 रविवार रोजी.सुवर्णकार सर्व शाखीय परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे.**

वधू-वर परिचय मेळावा काळाची गरज लक्षात घेऊनच आम्ही या परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे.तेव्हा समाजातील जास्तीत जास्त वधू वर यांनी फॉर्म भरुन या संधीचा फायदा घ्यावा. असे आम्ही संयोजक, आयोजक आव्हान करत आहोत.वधू-वर परिचय मेळाव्यासाठी आम्हाला कार्यक्रमाचे अध्यक्ष व अन्नदाते श्री गणेश शेठ अष्टेकर व सागर शेठ, सुरेश शेठ अष्टेकर लाभले आहेत.तसेच त्र्यंबकेश्वर संस्थेचे अध्यक्ष श्री दिलीप शेठ शहाणे, गोपाळ शेठ कुलथे, व नाशिक रोडचे अध्यक्ष डॉक्टर साहिल संदीप शेठ उदावंत, श्री संजय जी मंडलिक, हितकरणी सभा अध्यक्ष. कैलास शेठ भांबुर्डेकर, सुहास सेठ बार्शीकर,कैलास शेठ मैद,दत्तात्रेय शेठ मैड,गणेश शेठ जोजारे, भगवान शेठ शहाणे, श्रीकांत शेठ जोजारे.तसेच सुवर्णकार समाजातील असंख्य बंधूंचे सहकार्य आम्हाला लाभले आहे.हा परिचय मेळावा घेण्यामागचे मुख्य कारण आज लग्न जमवणे खरंच अवघड होऊन बसले आहे. कारण बरेच मुलीच्या पेक्षा मुलींच्या आईच्या अपेक्षा जास्त वाढलेल्या आहेत .तेव्हा आपण आता विचार करायला हवा मुलीचे खरे सुख कशात आहे. वय वाढून नंतर लग्न जमने मुश्किल होते. फक्त पैसा प्रॉपर्टी दाग दागिने गाड्या म्हणजे सर्व सूख नाही. शिक्षणाची पात्रता आर्थिक कमाई जमीन जुमला राहण्यासाठी स्वतःचे घर तसेच मुलगा पुणे, मुंबई, नाशिक येथील असावा. याच दुराग्रह हट्टा पायी विवाहाचे वय निघून जात आहे. ठराविक वयात वैवाहिक जीवनाची अनुकूलता. आणि निरामय आनंदाला ही पिढी पारखी होत आहे. तेव्हा आपण आपल्यावर लादून घेतलेल्या अटीमुळे आपले अपेक्षांचे दुराग्रह आपल्याला कुठे घेऊन जात आहेत यावर गंभीरपणे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. शेवटी जी तडजोड वय वाढल्यावर करणे आपरिहास आहे. त्यासाठी सगळे तारुण्य पणाला लावून अपेक्षांचे ओझे किती काळ वाटायचे.आज अपेक्षेचे ओझे वाढवून. नाहक मुला मुलींचे वय निघून जात आहे. याची खंत ना मुलांना, ना पालकांना. आजची परिस्थिती काही वर्षांनी तशीच राहील हे सांगता येत नाही. पालकांनो आणि मुलांनो भविष्याचा विचार करुन आजच निर्णय घ्या. अपेक्षांच्या जंजाळात अडकून न राहता. समजुतदारीने निर्णय घ्या. योग्य वेळेत योग्य वयात विवाहाचे निर्णय घ्या. काळ निष्ठूर आहे. चुकला त्याच्याकडे माफी नाही. आणि नंतरच्या पश्चातापाला अर्थ नाही.वरील सर्व गोष्टींचा विचार करून आम्ही सर्वसाखीय वधु वरपरिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे.तेव्हा समाजातील जास्तीत जास्त वधू आणि वरांनी या संधीचा फायदा घ्यावा.व सुवर्णकार समाजातील बंधू आणि भगिनींनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन आयोजन समितीतर्फे सर्वांना करण्यात येत आहे.हा कार्यक्रम आपल्या सर्वांचाच आहे.आम्ही महिला आयोजक खालील प्रमाणे.महिला अध्यक्षा गीता नवसे, समाजभूषण मीनाताई सोनार, पुष्पाताई उदावंत, अनिताताई मंडलिक, प्रेमिला ताई मैद, गीता ताई काजळे, ए सी पी सुरेखाताई कपिले, श्रीमती किरण अष्टेकर, श्रीमती अनुसया खेडकर, यशोदाताई पर्वतकर, अनिताताई शहाणे, अनिताताई दार्वेकर, जयाताई कुलथे, अंबिकाताई डहाळे, सुरेखाताई लोलगे, मंगल ताई नवसे, सीमाताई माळवे, आणि विजयाताई दहिवाळ. समाजभूषण.



**विजयाताई दहिवाळ,समाजसेविका, परळी वैजनाथ.9657614373**

**टिप - आदल्या दिवशी येणाऱ्यां समाज बंधू-भगिनीची राहण्याची व्यवस्था केलेली आहे.**

# तंत्रज्ञानाचं पापः व्यवसायाच्या नावे बालमनाची बोळवण

आजचा माणूस डोळ्यांतून ओळखता येतो. डोळे केवळ दृश्य पाहण्याचं माध्यम नाहीत, तर अंतर्मनातील विचार, भावना, अनुभव व्यक्त करण्याचं साधन आहेत. डोळ्यांतून माणसाचं वय, त्याची परिस्थिती, आणि कधी कधी त्याचं दुःखदेखील दिसून येतं. जर डोळ्यांतून माणूस ओळखता येतो, तर तंत्रज्ञानाच्या माध्यमातूनही ओळखता यायला हवं ना?

आपण अशा युगात आहोत जिथं मोबाईलचा वापर केवळ संवाद किंवा कामापुरता राहिलेला नाही. तो आता मुलांच्या मनात काय भरवलं जातं, काय दाखवलं जातं, याचा निर्णायक घटक झाला आहे. अशा वेळी जर तंत्रज्ञान इतकं प्रगत झालंय की ते चेहरा, आवाज, डोळे ओळखू शकतं, तर त्याच तंत्रज्ञानाला वापरकर्त्याचं वय ओळखणं इतकं अवघड का वाटतं?

वयाची अट आहे, पण अंधारातच प्रवेश आहे:

मोबाईलवरील अनेक वेबसाईट्स, अ‍ॅप्स, आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स हे '18+' अशा वयाची अट टाकून मोकळे होतात. पण ही अट फक्त शब्दात असते; अंमलबजावणीत तिचं अस्तित्वच नसतं. एक 12 वर्षांचा मुलगा देखील सहजपणे कोणताही कंटेंट बघू शकतो. कारण वय विचारण्याचं, चेहरा स्कॅन करून ते तपासण्याचं कोणतंच यंत्र नाही.

आज डोळ्यावरून माणूस ओळखण्याची तंत्रज्ञानं तयार झाली आहेत. फेस रेकग्निशन, आयरिस स्कॅन, बॉयोमेट्रिक ऑथेंटिकेशन – हे सगळं सहज उपलब्ध आहे. मग एक सोपं, नैतिकदृष्ट्या आवश्यक असलेलं तंत्रज्ञान का तयार होत नाही, जे मुलांना त्यांच्याच वयाच्या मर्यादेतील गोष्टी दाखवेल? उत्तर सोपं आहे – पैसा. नफ्याच्या अंध स्पर्धेमध्ये नैतिकतेला स्थानच उरलेलं नाही.

मोबाईलवाल्यांच्या घरात असं चालतं का?

एक मोठा प्रश्न असा आहे की, ज्यांनी हे मोबाईल, अ‍ॅप्स, प्लॅटफॉर्म्स तयार केले – त्यांनी स्वतःच्या मुलांना 10-12 वर्षांच्या वयात हे डिव्हाईस दिलं का? त्यांनी स्वतःच्या घरात अशा प्रकारचा कंटेंट पाहू दिला का? बहुधा नाही. कारण त्यांना माहिती आहे की हे वय अशा गोष्टींसाठी योग्य नाही. मग इतरांच्या मुलांना का?

मुलांच्या मनात काय भरतंय, ते काय पाहत आहेत, याबद्दल तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्यांनी, अ‍ॅप डेव्हलपरांनी आणि डिजिटल व्यासपीठ चालवणाऱ्यांनी खूप मोठी जबाबदारी घेतली पाहिजे. ती जबाबदारी त्यांनी टाळली, तर ते केवळ व्यावसायिक अपयश नसून – ते एक पाप आहे.

'फेसबुक'चं स्वरूप आणि मुलं:

अलीकडच्या काळात फेसबुकवर येणाऱ्या कंटेंटचं स्वरुपही चिंताजनक झालं आहे. वाढत्या वयाच्या, अपप्रचार करणाऱ्या, लैंगिकतेकडे आकर्षित करणाऱ्या पोस्ट्स, व्हिडिओज, रील्स आणि जाहिराती – हे सगळं खुल्या मैदानात चाललं आहे. अठरा वर्षांखालील मुलांना हे सहज उपलब्ध होतंय. पालक आंधळे नाहीत, पण तंत्रज्ञान त्यांच्या नियंत्रणाच्या बाहेर गेलंय.

हे सगळं केवळ मुलांनाच नव्हे तर संपूर्ण समाजाला एक मानसिक प्रदूषण देतंय. हे प्रदूषण कुठल्याही फिल्टरने थांबत नाही. कारण त्यामागे असलेल्या कंपन्यांना त्या फिल्टरमध्ये रसच नाही. त्यांना हवं आहे – क्लिक, लाईक्स, शेअर्स आणि जाहिरातीवर मिळणारा पैसा.

नफ्याची भूक आणि समाजाचं नुकसान:

ही भूक एवढी वाढली आहे की, आता पैसा मिळवण्यासाठी कोणालाही काहीही विकायचं, कोणालाही काहीही दाखवायचं, हीच एकमेव नीती ठरली आहे. पण समाज ज्या ठिकाणी पैशासाठी नैतिकता विकली जाते, तिथं पुढची पिढी अधःपाताच्या दिशेने जाते.

आपण असा प्रश्न आता विचारायला हवा – तुमचं तंत्रज्ञान जर समाजाच्या नैतिकतेचा विचार करत नसेल, तर ते विकास नव्हे, ते अधःपात आहे.

तंत्रज्ञानाने जबाबदारी घ्यायला हवी:

तंत्रज्ञान म्हणजे विकास आहे, मान्य. पण विकासाचा अर्थ फक्त साधनांचा वापर नव्हे – तो माणुसकीचा विचार असला पाहिजे. आज जर मोबाईलने चेहरा ओळखला, तर वय ओळखून योग्य कंटेंट दाखवणं काही अशक्य नाही. हे सहज शक्य आहे – पण त्यासाठी इच्छाशक्ती लागते, नफा बाजूला ठेवण्याची तयारी लागते, आणि समाजाप्रती आपुलकी लागते.

जर अशी यंत्रणा तयार केली गेली की जी चेहरा ओळखून वापरकर्त्याचं वय ठरवेल, आणि त्याला त्याच वयाच्या अनुरूपच गोष्टी दाखवेल – तर हे एक क्रांतिकारी नैतिक तंत्रज्ञान ठरेल. आणि हे करायला तांत्रिक ज्ञान लागतंय असं नाही – हे करायला मन लागतंय.

अंतिमतः मी असं म्हणेन का, तंत्रज्ञानाने जर समाजात प्रवेश केला आहे, तर त्याने समाजाची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. प्रत्येक मोबाईल कंपन्याने, सोशल मिडिया प्लॅटफॉर्मने, अ‍ॅप डेव्हलपरने हे लक्षात घ्यायला हवं – पैशासाठी काहीही दाखवणं हे व्यवसाय नाही – ते पाप आहे.

पुढील पिढीच्या डोळ्यांतून जे दिसतंय, ते त्यांचं भविष्य ठरणार आहे. ते डोळे जर चुकीच्या गोष्टींनी भरले, तर त्यांचं आयुष्यही चुकीच्या दिशेने जाईल. त्यामुळे या 'डोळ्यांतून' वय ओळखण्याच्या काळात – तंत्रज्ञानालाही 'नीती'चा डोळा असायलाच हवा.

**डॉ. भारत कऱ्हाड (प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी)**

# पडीक वाड्यातील गुप्तधन..

**भाग एक**

मानव उत्क्रांतीच्या नंतर पाशन युगाला सुरवात झाली,तसतसे मानवाच्या बुद्धिमत्ता वाढीस सुरुवात झाली, आणि मग समाजाने स्वतःची ओळख निर्माण करून प्रगतीचा आलेख वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु केले, यात सुरुवातीच्या काळात विविध दगडी औजारे, स्वतःसाठी विशेष निवारा,शिकार सहजतेने करण्यासाठी नवनवीन प्रयोगशील हत्यारे, मग ती शिकार फक्त स्वतःलाच उपयोगी पडावी म्हणून ती लपविण्यासाठी आगळी वेगळी जागा आणि मग तिथूनच मानवी उत्क्रांतीला सुरुवात होऊन स्वतःचं धन दौलत सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी विविध प्रकारच्या वैविध्यपूर्ण जागा.

पण काळ जसा जसा बदलत गेला तसतसे मानवी स्वभाव लोभी बनत दुसऱ्याच्या वस्तूवर एकप्रकारे डल्ला मारण्यासाठी काही टोळ्या सक्रिय झाल्या आणि मग त्या प्रवृत्ती विरोधात स्वतःचे धन कसे सुरक्षित राखायचे यासाठी वरील दोन प्रवृत्ती मध्ये घनघोर असा शहकतशः प्रकारचा अनोखा शह-कटशह सामना सुररु झाला याचे उत्तम उदाहरण म्हणजे अंदाजे पाच हजार वर्षांपूर्वी असलेले इजिप्त मधील अनेक पिरॅमिड.आज देखील अनेक पिरॅमिड रहस्यमय आहेत,त्यामधील गुंतागुंत अजूनही सुटलेली नाही.

हे परदेशातील, तर आपल्या देशात राज्यात इतकंच काय तर आपल्या शहरात देखील आजही अनेक रहस्यमयी वाड्यात गुप्तधन लपविण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरण्यात आल्या आहेत.

पूर्वीच्या काळी आपली घन दौलत सुरक्षित राहण्यासाठी, वाड्यात आतल्या बाजूला जमिनीत खड्डा करुन



एखाद्या मठात,तांब्याच्या घागरीत किंवा ईतर कोणत्याही भाड्यात धन दौलत ठेवून त्यावर विधिवत पूजा अर्चा करुन आगळ्यावेगळ्या प्रकरचा रखवालदार ठेवण ते बंद करण्यात येत, आणि मग ज्या तांत्रिक साहाय्य घेऊन ते बंद केले आहे तो तांत्रिक मग तो त्याच्या काही काळ्या विद्याच्या साह्याने तो रखवालदार जीवंत करत आशा अनेक दंतकथा प्रचोलित आहेत..

पण सत्य परिस्थिती लक्षात येण्यासाठी एक घटनेचा मी उल्लेख करणार आहे, आमच्या शहरात गाव भागात अनेक मोठं मोठाली वाडे आजही कायम आहेत.कालांतराने अनेकांनी आपापली वाडे पाडून त्यावर नवीन बांधकाम केली,तर अनेकांनी जुने वाडे विकून नवीन जागेत राहण्याची व्यवस्था केली. त्यामुळे अनेकांनी जागेची देवाणघेवाण केली, याच प्रकरणात ऐका हॉटेल व्यवसायिक मित्राला त्याची स्वतःची जागा आपुरी पडत होती एकतर त्याचा कुटुंबकबीला मोठा असल्याने आणि एकत्रित कुटुंब पद्धती असल्याने पूर्वी राहत असलेली जागा कमी पडत असल्याने त्याने नवीन जागेसाठी शोध सुरु केला,यामध्ये प्रामुख्याने अनेक खुले प्लॉट,आयते बांधकाम असलेल्या वस्तू असा शोध सुरु केला,याचवेळी एकेदिवशी हॉटेलमधील कामकाज उकरून घरीं येण्यासाठी निघाला यातच त्याचे दुचाकी वाहन बंद पडल्याने,आणि थोडासा उशीर झाला असल्याने पटकन घर गाठण्यासाठी अधिक वेगाने निघाला, यातच हलक्या पावसाने हजेरी लावली जसा तो गल्लीत आला तसा ऐका कोपऱ्यात असलेल्या पडक्या वाड्यातून, "मी येतो "मला मोकळं कर: असा कसला तरी विलक्षण आवाज आला, त्यामुळे दचकून त्याने इकडे तिकडे बघितले, पण कोणीही आजूबाजूला नव्हते, आणि पुन्हां तोच आवाज पण थोडासा अधिक स्पष्टपणे त्या पडीक वाड्यातूनआला,मग मात्र थोडा दचकला आणि त्याने घर गाठलं, पण काही दिवसानंतर तोच प्रकार वारंवार घडू लागला त्यामुळे त्याला काही समजत नव्हते, आणि दुसऱ्या कोणालाही तो ही गोष्ट बोलू शकत नव्हता कारण,इतरांनी त्याकडे विनोदी दृष्टीकोनातून बघितले असते त्यामुळे त्याने कसलीही चर्चा केली नाही,आणि अशातच एकेदिवशी त्याच्या हॉटेलवर एक हेमाडपंथी साधू आला आणि काही खायला दे दक्षिना दे म्हणला,माझ्या मित्राला कुणासकाय वाटलें की त्याने त्या साधूला यथोचित दिलं, त्यानंतर परत जातांना त्या साधूने मित्राला, तुला एक आवाज येत आहे ती जागा ताब्यात घे,आणि मी चातुर्मास करून परत आलो की पुढील कार्य सांगतो,पण आपल्या दोघांतील एक शब्दही इतरांना कळता कामा नये ही सक्त ताकीद देऊन तो पुढील प्रवासाला निघून गेला, तसा त्या मित्राने तो वाडा घेण्यासाठी हालचाली सुरु केल्या, सुरुवातीला घरच्यांना तो वाडा घेऊन नवीन आदयव्ही इमारत बाधू किंवा त्यालाच दुरुस्ती करून राहुत असे सांगितले, मग घरचे तयार झाल्यानंतर तो वाडा सामूहिक मालकीच्या भाऊ बांधकीचा असल्याने प्रत्येकाला गाठून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष समजून सांगत विशिष्ट रकमेवर व्यवहार ठरला, पण तो काही पूर्ण होत नव्हता, कधी काही घटना घडे आणि अडथळे निर्माण होत,त्यामुळे मित्रांने हैराण होऊन अनेक उपाययोजना केल्या आणि मग एकेदिवशी खरेदी खत झाले ,आणि तो निझामकालीन पडीक वाडा मित्राच्या मालकीचा झाला...क्रमशः



**सचिन स्वामी 9623873396**










हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अ‍ॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

# तीनही चाफेकर बंधू देशासाठी शहीद!

## (8-16 मे: चाफेकर बंधू शहादत विशेष.)

चाफेकर बंधू हे आद्यक्रांतिकारी होते. त्यांची नावे दामोदर हरिपंत चाफेकर यांचा जन्म दि.24 जून 1869, बाळकृष्ण हरिपंत चाफेकर यांचा जन्म 1873 आणि वासुदेव हरिपंत चाफेकर यांचा जन्म 1880 अशी होती. 19व्या शतकाच्या उत्तरार्धात पुण्याचे ब्रिटीश प्लेग कमिशनर वॉल्टर चार्ल्स रँड यांची हत्या करण्यात या क्रांतिकारकांचा सहभाग होता. पुण्यातील जनता ही नियुक्त केलेल्या अधिकारी आणि सैनिकांच्या अत्याचारांनी त्रस्त होती. या हत्येत महादेव विनायक रानडे हेही साथीदार होते. वासुदेव हरिपंत चाफेकरांचा जन्म सन 1880मध्ये चिंचवड मध्ये एका चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांनी मराठी भाषेमधून शिक्षण घेतले. कालांतराने ते पुण्यातील चिंचवड येथे स्थायिक झाले. वडील हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यांमुळे चाफेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला होता. वासुदेव चाफेकर यांनी दामोदर चाफेकर आणि बाळकृष्ण चाफेकर या त्यांच्या बंधूंसह राजकारणात आणि क्रांतिकारी कारवायांमध्ये भाग घेतला. त्यांनी भारतीय तरुणांना शस्त्रांचे प्रशिक्षण दिले.

पुण्यातील राजकीय घडामोडींनी प्रेरित होऊन हे भाऊ क्रांतिकारक चळवळीकडे वळले. ब्रिटिशांनी आणलेल्या संमती वयाच्या विधेयकास त्यांचा तीव्र विरोध होता. भारतीय संस्कृतीत हस्तक्षेप करणाऱ्या ब्रिटिशांविरुद्ध टिळकांनी केसरीमधून घणाघाती प्रहार करायला सुरुवात केली होती. या आवाहनाने तीनही भाऊ प्रेरित झाले. त्यांनी लोकसंघटन केले. याचवेळी पुण्यात प्लेगच्या साथीने अक्राळविक्राळ स्वरुप धारण केल्याने ब्रिटिशांनी वॉल्टर चार्ल्स रँडला भारतात पाचारण केले. रँडने रोग निवारण करण्याच्या उपायांची सक्तीने अंमलबजावणी सुरु केली. हे करताना त्याने सामाजिक पायदंड पायदळी तुडवले. जसे की लोकांची घरे उपसून जाळणे, देवघरात जाऊन देवांचा अपमान करणे, तपासणीच्या नावाखाली महिलांशी अभद्र वर्तन करणे, कर्त्या पुरुषांना नामर्दाप्रमाणे हीन वागवणे. यामुळे चाफेकर बंधूच्या मनात ब्रिटिशाविरुद्ध तिरस्कार निर्माण झाला. या साऱ्यांचा सूड घेण्याची योजना त्यांनी तयार केली. वॉल्टर चार्ल्स रँडच्या पुण्यातील लोकांना दिलेल्या वाईट वागणुकीबद्दल या भावांनी त्याच्या वधाचा कट रचला. त्यावेळी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव साजरा करण्यात येत होता. सगळीकडे रोषणाई करण्यात आली होती. तसेच मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. दामोदर चाफेकर या तरुणाने गाडी काढली व गणेश खिंड येथे वाट पाहत दि.22 जून 1897 रोजी मध्यरात्री निवासस्थानातून बाहेर पडलेल्या रँडवर जवळून गोळ्या झाडल्या. रँड हा काही काळ कोमात राहिला व कालांतराने दि.3 जुलै 1897 रोजी मरण पावला. याचवेळेस दामोदराच्या भाऊ बाळकृष्णाने रँड सोबत बसलेल्या लेफ्टनंट आयरिस्टवर गोळ्या झाडल्या. सर्वसामान्यपणे चापेकर असा उल्लेख चुकीचा होत असला तरी या क्रांतिकारक बंधूंचे आडनाव चाफेकर असे होते. चापे या नावाचे गाव कोकणात नाही. या खुनाच्या घटनेनंतर चाफेकर बंधू हे आमचे नातेवाईक नाहीत, हे पटवण्यासाठी अनेक चाफेकरांनी आपले आडनाव चापेकर आहे, असे सांगावयास सुरुवात केली.

त्यामुळे ब्रिटिश सरकार हादरुन गेले. कित्येक दिवस ब्रिटिशांना मारेकऱ्यांचा शोध लागत नव्हता. शेवटी पंचमस्तंभि द्रविड बंधूनी- रामचंद्र व गणेश शंकर द्रविड यांनी या कटाची बातमी केवळ आर्थिक 20,000रु. च्या लाभपोटी सरकारला दिली. नंतर वासुदेव चाफेकर व महादेव रानडे यांनी द्रविड बंधूंना ठार केले. तिघाही भावांना पकडण्यात आले. दामोदराला मुंबईत अटक झाली व दि.18 एप्रिल 1898 रोजी त्यास येरवडा तुरुंगात फासावर चढवण्यात आले. त्यापाठोपाठ वासुदेवाला दि.8 मे 1899 व बाळकृष्णाला दि.16 मे 1899 रोजी फासावर चढवण्यात आले. अशा प्रकारे तीनही चाफेकर बंधू देशासाठी शहीद झाले. दामोदर चाफेकर यांनी आत्मचरित्र लिहिले होते, ते पोलिसांनी त्यांच्या ताब्यात ठेवले होते. पुढे हुतात्मा दामोदर हरी चाफेकर यांचे आत्मवृत्त या नावाने विठ्ठल गोपाळ खोबरेकर यांनी संपादित करून ते प्रकाशित केले. पुण्यानजीक असलेल्या चिंचवड गावाजवळच्या चौकाला चाफेकर चौक म्हणतात. या चौकात मध्यभागी एका टॉवरमध्ये दामोदर चापेकर यांचा सन 1971मध्ये उभारलेला पुतळा होता. मात्र तो पुतळा रस्ता रुंदीकरणाच्या व उड्डाणपुलाच्या कामाच्या कारणाने सन 2010मध्ये हलविण्यात आला. त्यानंतर चौकातच चापेकर बंधूंच्या समूह शिल्पाचे काम सुरु करण्यात आले होते. मात्र हे काम या ना त्या कारणावरुन सतत रखडत होते. क्रांतिकारकांचे पुतळे तीन ते साडेतीन फुटांचे आणि त्यांखाली एक छोटा चौथरा अशा पद्धतीने काम चालू होते. परंतु क्रांतिवीर चाफेकर स्मारक समितीचे गिरीश प्रभुणे, बाळकृष्ण पुराणिक आदींनी या प्रकल्पातील त्रुटी निदर्शनास आणल्या. त्यानंतर तत्कालीन महापालिका आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी चालू काम थांबवून नव्याने आराखडा करण्यास सांगितले. नव्या आराखड्यानुसार या चाफेकर चौकात दि.10 जुलै 2016 रोजी दामोदर चाफेकर व बाळकृष्ण चाफेकर यांचे 12 फूट उंचीचे उभे आणि वसुदेव चाफेकर आणि महादेव रानडे यांचे बसलेले सात फूट उंचीचे पुतळे उभारण्यात आले आहेत.

!! क्रांतिकारक चाफेकर बंधूंना त्यांच्या हौतात्म्य निमित्त मानाचा मुजरा !!

**- संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार**
**आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**

# सातार्‍यात कर्मवीर पुण्यतिथीनिमित्त शरद पवार-अजित पवार एकत्र



सातारा : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमाच्या निमित्ताने खासदार शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा एकत्र येणार आहेत. शरद पवार साताऱ्यात आज गुरुवारी सायंकाळी दाखल झाले आहेत. शुक्रवारी सकाळी साडेसात वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार येणार आहेत. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर हे दोघे एकत्र येत असल्याने या कार्यक्रमाकडे लक्ष लागले आहे.

कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या कार्यक्रमात पुन्हा शरद पवार, अजित पवार एकाच मंचावर बसणार आहेत. एक महिन्यापूर्वी रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीला शरद आणि अजित पवार एकत्र आले होते. दोघांमध्ये संस्थेच्या अनुषंगाने काही चर्चाही झाली होती.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील यांनी साताऱ्यात पक्षबांधणी सुरु केली आहे. कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी आणि कार्यक्रमांना उपस्थिती असा दौरा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महिन्यात दुसऱ्यांदा आयोजित केला आहे.




## पान 1 वरुन

**प्रत्युत्तर दिलं जाईल, असा इशारा देण्यात आला होता", असा पुनरुच्चार विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी केला. "७-८ मे च्या रात्री, पाकिस्तानने अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू , पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना , आदमपूर, भटिंडा , चंदीगड , नाल, फलोदी, उत्तरलाई आणि भुज यासह उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी लक्ष्यांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. इंटिग्रेटेड काउंटर यूएएस ग्रिड आणि एअर डिफेन्स सिस्टमने हे लक्ष्य निष्क्रिय केले. या हल्ल्यांचे अवशेष आता अनेक ठिकाणांहून सापडत आहेत जे पाकिस्तानी हल्ल्यांचे पुरावे आहेत", असं परराष्ट्र मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आलं. आज सकाळी भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील अनेक ठिकाणी हवाई संरक्षण रडार आणि प्रणालींना लक्ष्य केले. भारताने पाकिस्तानप्रमाणेच त्याच क्षेत्रात प्रत्युत्तर दिले आहे. लाहोर येथील हवाई संरक्षण प्रणाली निष्क्रिय करण्यात आले आहे", असंही त्यांनी म्हटलंय.लाईन ऑफ कंट्रोलवर पाकिस्तानकडून विनाकारण गोळीबार वाढवण्यातआला आहे. कुपवारा, बारामुल्ला, उरी, पूछ, मेंधर, राजौरी येथे हल्ले करण्यात आले आहेत. यामध्ये १६ स्थानिकांचा मृत्यू झाला असून यात ३ महिलांचा आणि पाच लहान मुलांचा समावेश आहे. याविरोधातही भारताने प्रत्युत्तर दिलं आहे, असं सरकारने स्पष्ट केलं. यापुढे जर पाकिस्तानने हल्ले वाढवले तर त्याच पद्धतीने भारताकडूनही प्रत्युत्तर दिलं जाईल. त्यामुळे आता पाकिस्ताननेच पुढचा निर्णय घ्यायचा आहे", असं परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी म्हटलं आहे.**

---------------------------------------------------

शहरांवर हल्ला केला. परंतु भारताने त्यांचे हे प्रयत्न देखील नाकाम केले आहेत. यामध्ये पाकिस्तानने भारताच्या लष्करी तळांना लक्ष केले होते. जम्मू, अवंतीपोरा, अमृतसर, जालंधर आदमपूर, लुधियाना, पठाकोट, बंठिंडा आणि चंदीगडसह 15 शहरांवर क्षेपणास्त्रे डागली होती. परंतु भारताने ही क्षेपणास्त्रे देखील हाणून पाडली आहेत. तसेच पाकिस्तानने जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा, बारामुल्ला, फरी, पूंछ, मेंढर आणि राजौरी सेक्टरमध्ये LoC वर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र भारताने पाकिस्तानचा हा डाव देखील उलटून लावला आहे.

दरम्यान भारताने सिंदूर मोहीमेअंतर्गत कारवाई करत पाकिस्तानच्या लाहोमधील एअर डिफेन्स रडार सिस्टिमही उखडून टाकले आहे. पाकिस्तानचे हे HQ-9 एअर डिफेन्स सिस्टिम चीनने दिलेले होते. परंतु भारताने ही प्रणाली नष्ट केली आहे. भारताच्या हवाई दलाने यामध्ये S-400 या अत्याधुनिक सुदर्शन चक्रचा वापर केला. भारताने चीनचे HQ-9 रडार उद्ध्वस्त करुन टाकले आहे. भारताच्या S-400 यामध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे. S-400 प्रणाली शत्रुच्या हल्ल्याला पाडण्यासाठी भारताची ही महत्वपूर्ण ठरली आहे.

दरम्यान या हल्ल्यानंतर अमेरिका, रशिया ने दोन्ही देशांना संयम बाळगून शांततेच्या मार्गाने संवाद करण्याचे आणि प्रश्न सोडवण्याचे आवाहन केले आहे. तसेच चीनने देखील पाकिस्तानची साथ सोडली आहे. तुर्कीशिवाय, इतर मुस्लिम देशांनी देखील पाकिस्तानला लाथाडले आहे. दरम्यान यानंतरही पाकिस्तानची गुर्मी उतरलेली नाही. भारताला पोकळ धमक्या देण्याचे काम सुरुच आहे.

------------------------------------------

हैराण झाले आहेत. थर्मल कॉलनी जवळील रस्ते महामार्गाचे काम चालू असलेल्या ठिकाणी हलगर्जीपणामुळे परळी शहराला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटल्याने आठ दिवसांपासून गावभागाला पाणीपुरवठा बंद आहे. यापूर्वीही अनेकवेळा विविध ठिकाणी पाईपलाईन फुटल्याच्या घटना घडल्याने नागरिकांना नाहक त्रास होत आहे. याबाबतीत अश्विन मोगरकर यांनी प्रशासनाकडे तक्रार करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. मुख्याधिकारी यांनी त्वरित दखल घेत ईटके कॉर्नर येथे पाईपलाईन दुरुस्ती ठिकाणी येऊन कामाची पहाणी करुन त्वरित दुरुस्ती संदर्भात आदेश दिले. पाईपलाईन दुरुस्तीचे काम पूर्ण करून गावभागात पाणी येईल असे पाणीपुरवठा अभियंता साळवे यांनी सांगितले. वारंवार पाईपलाईन फुटण्याच्या घटनेत वाढ होत असल्याने नागरिकांना कृत्रिम पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याने यावर त्वरित कार्यवाही करण्याची मागणी भाजपा पदाधिकारी अश्विन मोगरकर यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

----------------------------------------

## पान 4 वरुन

**बीड शहरातील मध्यवर्ती भागात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरु होता. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर बीड शहर पोलिसांनी स्पा सेंटरवर मोठी कारवाई केली आहे. ब्लीस स्पा नावाच्या सेंटरच्या तळघरात हा बेकायदेशीर प्रकार सुरु होता. कारवाई अंतर्गत पोलिसांना स्पा चालकाला बेड्या ठोकल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बीड शहरातील सारडा कॅपिटल परिसरात ब्लीस स्पामध्ये वेश्याव्यवसाय सुरु होता. स्पाच्या तळघरामध्ये मागील काही दिवसांपासून हा प्रकार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून काल (7 मे) रात्री 8 च्या सुमारास कारवाई केली. कारवाईत चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान बीड पोलिसांनी नाशिक येथील एका पीडित महिलेची सुटका केली. पीडित महिलेला जबदस्तीने या व्यवसायामध्ये ढकलले गेल्याची माहिती प्राथमिक माहिती समोर आली आहे. शहरातील गजबजलेल्या आणि मध्यवर्ती ठिकाणी वेश्या व्यवसाय सुरु असल्याची माहिती समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. बीड शहर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सारडा कॅपिटल येथे स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरु होता. डमी ग्राहक पाठवून पोलिसांनी या सेंटरवर छापा मारला. यात पोलिसांनी एका पीडित महिलेची सुटका केली, तर चालकाला ताब्यात घेतले.**

---------------------------------------------

कारवाईत चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान बीड पोलिसांनी नाशिक येथील एका पीडित महिलेची सुटका केली. पीडित महिलेला जबदस्तीने या व्यवसायामध्ये ढकलले गेल्याची माहिती प्राथमिक माहिती समोर आली आहे. शहरातील गजबजलेल्या आणि मध्यवर्ती ठिकाणी वेश्या व्यवसाय सुरु असल्याची माहिती समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. बीड शहर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सारडा कॅपिटल येथे स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरु होता. डमी ग्राहक पाठवून पोलिसांनी या सेंटरवर छापा मारला. यात पोलिसांनी एका पीडित महिलेची सुटका केली, तर चालकाला ताब्यात घेतले.

----------------------------------------

यांची पतसंस्थेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

पोलीस बांधवांना अडीअडचणीच्या काळात मदत मिळावी या हेतूने सुरु करण्यात आलेली बीड जिल्हा पोलीस पतसंस्थेच्या संचालक मंडळांच्या निवडीला पाच वर्ष पूर्ण झाल्याने नवीन संचालक मंडळाची निवडणूक लागली होती. परंतु सर्व सभासद आणि संचालक मंडळाने एकत्र येत बिनविरोध निवडणूक घेण्याचे ठरविले. गुरुवारी दि.8 मे रोजी पतसंस्थेच्या कार्यालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते संचालक मंडळ आणि पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी अशोक दुबाले, उपाध्यक्ष संघर्ष गोरे, सचिव ज्ञानेश्वर परळकर तर संचालक म्हणून मनोज जोगदंड, मनोज वाघ, नितीन साळवे, सचिन जायभाय, संतोष म्हेत्रे, शहेंशा सय्यद, रेखा गोरे, रंजना सांगळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीबद्दल नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

--------------------------------------------

शिक्षण संस्थेचे 24 वर्ष अध्यक्ष पद भूषवले. लोक पावलेली वारकरी परंपरा पुनर्जीवित करण्यासह संप्रदायाला बळ देण्याचं काम स्वामी महाराज यांनी केले. संत वामन भाऊ , संत भगवान बाबा यांना घडवण्याचे काम बंकट स्वामी महाराजांनी केले. स्वातंत्र्याच्या अगोदर बहुजनातील सर्व जाती धर्माच्या व्यक्तींना सांप्रदायाचा कीर्तन भजनाचा अधिकार दिला व जाती तोडा आणि समाज जोडा हा मोलाचा संदेश बंकटस्वामी महाराजांनी दिला. बंकटस्वामी संस्थांचा आज विकास होत आहे यात खारीचा वाटा म्हणून जो काही हातभार लावता येतो तो मी नेहमी संस्थांचा भक्त या नात्याने कायम सेवेत राहील असेही क्षीरसागर म्हणाले

-----------------------------------------

लुबानाज युनूस 71.73% व कला शाखेतून प्रथम येणायचा मान शेख अल्फिशर जब्बार 81.83%, दुतीय शेख जवेरिया फातेमा इरफान 69.17% तृतीय कु. कुरेशी अनम फातिमा अब्दुल रहीम 66.33% या विद्यार्थीनींचा सत्कार

मंचावर उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावर्षी एकूण 89 विद्यार्थी एच.एस.सी.बोर्ड परीक्षेस प्रविष्ठ झाले होते त्यांपैकी 88 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली पैकी

प्रथम श्रेणीत 32 विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत 43 तर 2 विद्यार्थी विशेष प्रवीण्यासह उत्तीर्ण झाले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभास डॉ. झाकीर हुसेन उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या पठाण मुनवरी बेगम हसन खान यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच डॉ. झाकीर हुसैन उर्दू उच्च माध्यमिक विद्यालयाती सर्व प्राध्यापक, माध्यमिक विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. डॉ. झाकीर हुसैन एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष हाजी वाहजुद्दीन मुल्ला साहेब यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या..

-----------------------------------------

मंदिराची पाहणी करण्यासाठी येत आहेत. वैशाख शुद्ध मोहिनी एकादशी निमित्त लाखो भाविकांनी गडावर येऊन गडावरील विजयी पांडुरंगाचे दर्शन घेऊन ह.भ.प.वै.श्रीगुरु ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा, वै. गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराज, विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांचे आशीर्वाद घेतले. गडावर दिवसभर आलेल्या लाखो भाविकांनी दर्शनानंतर नित्य सुरु असलेला बाबांचा प्रसाद ग्रहण केला. भगवानगडाच्या एकूणच लाखो भाविकांपैकी गेवराईचे पंडित घराणे हे भगवानगडाचे एक निस्सीम भक्त आहेत. घरात परंपरा असल्यामुळे हा परिवार नेहमीच भगवानगडावर येऊन आशीर्वाद घेतो. वैशाख शुद्ध एकादशी निमित्ताने माजी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे शिक्षण महर्षी शिवाजीराव दादा पंडित हे दर्शनासाठी गुरुवारी श्री क्षेत्र भगवानगडावर आले होते. श्री संत भगवानबाबांच्या समाधीचे दर्शन झाल्यानंतर दादांनी श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांचे आशीर्वाद घेतले. यावेळी शास्त्रीजींनी सोबत येऊन शिवाजीराव दादांना गडावर सुरु असलेले माऊली मंदिराचे भव्य बांधकाम दाखवले. मंदिराबद्दल सर्व माहिती दिली. पुढे शास्त्रीजी म्हणाले की, श्री संत भगवानबाबांनी आयुष्यभर पाण्यावर बसून ज्ञानेश्वरी वाचली. आज त्याच गडावर सुरु असलेले ज्ञानेश्वरी विद्यापीठ आणि त्या विद्यापीठातून संपूर्ण ज्ञानेश्वरी पाठांतरासह ज्ञानेश्वरीचा सखोल अभ्यास करून शेकडो विद्यार्थी आज राज्यभर वारकरी संप्रदायाच्या प्रचार आणि प्रचार करत आहेत. गडावर आठवीपासून प्रवेश दिला जातो. शालेय व महाविद्यालयीन शिक्षणानंतर गोरगरिबांच्या लेकरांना आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अनेकांना पुणे, मुंबई सारख्या शहरांमध्ये राहून पुढचे शिक्षण घेणे शक्य होत नाही. गोरगरीबांच्या लेकरांच्या शिक्षणाची हीच अडचण समजून घेत भगवानगडाने गडावर विनामूल्य एमपीएससी यूपीएससीचे शिक्षण देणे सुरु केले. आज या स्पर्धा परीक्षा केंद्रातून अनेक विद्यार्थी अधिकारी होऊन बाहेर पडत आहेत. भगवानगडाचे एवढे भव्य दिव्य स्वरुप पाहून माजी मंत्री शिवाजीराव दादांनी मनोमन समाधान व्यक्त केले.

----------------------------------------

पाटोदा तालुक्यातील अनेक गावांमध्ये नियमित कचरा संकलन होत नाही. कचरा कुजत असल्यामुळे दुर्गंधी, डास, आणि साथीचे रोग पसरत आहेत. स्थानिक स्वच्छता कर्मचारी अपुरे असून, पाण्याचीही सोय नसल्याने सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे दुरापास्त झाले आहे. कोट्यवधींचा खर्च, पण परिणाम कुठे? जिल्हात दिसत असून स्वच्छ भारत मिशनसाठी सरकारी निधीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. मात्र, हा निधी प्रत्यक्ष कामांमध्ये दिसून येत नाही. सरकार आणि प्रशासनाची नजर केवळ बैठकीपुरती स्वच्छता दाखवण्यात आहे का? असा सवाल पाटोदा तालुक्यातील नागरिक उपस्थित करत आहेत. या प्रकारांनाची चौकशी होऊन दोषींवर कारवाई झाली पाहिजे अशी मागणीही पाटोदा तालुक्यातील नागरिकांनी केली आहे.

-----------------------------------------

दिनांक 9 मे 2025 शुक्रवारी बीड नगर परिषदेच्या प्रशासना विरोधात निघणाऱ्या हंडा मोर्चात मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी महिला प्रदेश सचिव व महाराष्ट्र करणी सेनेच्या महिला प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड. संध्याताई राजपूत यांनी केले आहे.

----------------------------------------

अदा करणे, भीमाई नगर व साकुड रोड परिसरात शहरी योजनांचा लाभ देत हा भाग शहरी हद्दीत घेणे अशा विविध पुढील प्रमाणे

मागण्या घेऊन निवेदन सादर केले.

प्रभाग क्रमांक 4 (परळीवेस भाग) सह शहरातील सर्व प्रभागा मध्ये मालमत्ता / मागणी कर नोंदवहीत नोंद नसणारे मालमत्ता करापासून वंचित असणाऱ्या मालमत्तांचे पुनः सर्वेक्षण करत तात्काळ पथक प्रमुख व सहायक यांची नेमणूक करून 15 दिवसांच्या आत सर्वांचे सर्वेक्षण करत पी. टी .आर. नोंदणी करण्यात यावी.

सदरील प्रक्रियेत टाळाटाळ करत असल्यास करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. रमाई आवास घरकुल योजना दुसऱ्या टप्प्यात 123 मंजूर लाभार्थ्यांच्या खात्यासाठी दिनांक 28/04/2025 रोजी अंबाजोगाई नगर परिषद खात्यात वर्ग केला असून , संबंधित मंजूर लाभार्थ्यांना "मंजुरी पत्र" देत लाभार्थ्यांच्या खात्यात निधी वितरीत करण्याची प्रक्रिया आठ दिवसांच्या आत पूर्ण करावी. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपूर्वी आपण सांगितल्या प्रमाणे 14 एप्रिल पूर्वी डॉ बाबासाहेब आंबेडकर मोफत अभ्यासिकेच लोकार्पण न करता आंबेडकर अनुयायी व गोर गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पूर्ण न करता वेळ काढू भूमिका समोर ठेवत उद्घाटन करण्याचे ठरवले त्यात अद्याप पर्यंत या अभ्यासिकेच्या उद्घाटनाची कोणतीही कार्यक्रम पत्रिका न जाहीर केल्याने आम्ही सर्व विद्यार्थी व आंबेडकर अनुयायी 14 मे नंतर अंबाजोगाई शहराच्या शैक्षणिक विकास व वारसासाठी कोणत्याही क्षणी लोकार्पण करत असल्याबाबत. शहरात दिवसेंदिवस सर्वच प्रभागात दूषित पाण्याचा पुरवठा केला जात असून रोगराई व आजाराचे प्रमाण शहरात पाण्यामुळे वाढत असून संबंधित कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करत पाणी पुरवठा सुरळीत करणेबाबत. तसेच गृहनिर्माण विभाग, शासन परिपत्रक, दिनांक 20/10/2018 नुसार प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास घरकुल योजना (शहरी) करिता मागील तीन वर्षांच्या कराच्या पावतीच्या आधारे लाभार्थी पात्र करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला त्याची तात्काळ अंमलबजावणी करणेबाबत. नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांचे थकीत वेतन तात्काळ अदा करणेबाबत. नगर परिषद अंतर्गत सेवेत असणाऱ्या शासकीय कर्मचारी व अधिकारी यांचे "मार्च व एप्रिल" महिन्याचे वेतन अदा करत संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन न थकीत करता वेळेवर वेतन अदा करण्यात यावे. दिव्यांग बांधवांचा 5 टक्के राखीव निधी तात्काळ दिव्यांगांच्या खात्यात वितरीत करण्यात यावा. रविवार पेठ पाण्याची टाकी जवळील साकुड रोड भागातील भीमाई नगर, परशुराम नगर व ईदगाह परिसर या भागातील नागरिकांना पंतप्रधान शहरी आवास योजना, शहरी रमाई आवास घरकुल योजना व शहर विकासा अंतर्गत येणाऱ्या योजनांचा लाभ देण्यात यावा आणि हा भाग नगर परिषद हद्दीत समाविष्ट करण्यात यावा.

या सर्व वरील मागण्या मान्य करण्याचे विनंती पत्र वंचितने सादर केले असून यावेळी वंचितचे शहराध्यक्ष गोविंद मस्के, महासचिव नितिन सरवदे, लखन होके, सुनिल कांबळे, समाधान कसबे, शिवा सोनवणे, दिपक पोटभरे आदी उपस्थित होते.

---------------------------------------

तालुका अध्यक्ष पद देण्याची मागणी करताना । दिसतात

----------------------------------------

देण्यासाठी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आबा मिश्रा मॅम तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रशांत चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉक्टर यशवंतराजे भोसले सर हे होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अजहर सर यांनी केले यावेळी मंचावर गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य अमित बिंदू सर,पूनम कानापूरकर मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

-----------------------------------------------

दहशतवादी कारवायांचे केंद्र राहिलेले आहेत. याठिकाणी हल्ले करून दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करून पहलगाम येथील हल्ल्याचा बदला घेतला आहे. दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करणा-या "ऑपरेशन सिंदूर" अंतर्गत कारवाई केलेल्या भारतीय सेना आणि भारतीय सरकारचा आम्हाला सार्थ अभिमान असुन आम्ही एकजुटीने पाठिशी असुन भारतीय परंपरेत "कुंकु"हे सौभाग्याचं लेणं मानलं जाते. पहलगाम हल्ल्यात काही नवविवाहित युवकांनी जीव गमावला. त्यांच्या विधवा पत्नींचे शोकाकुल चेहरे पाहून संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली होती. त्यामुळे "ऑपरेशन सिंदूर" मोहिमेची माहिती जगाला देणा-या दोन रणरागिनी भारत सरकारने पत्रकार परिषदेत माहिती दिली.

यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्यासह लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि वायुदलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग याची माहिती देण्यासाठी निवड करत भारताच्या लेकी अतिरेक्यांना ठोस प्रतिउत्तर देऊ शकतात हा संदेश देण्यात आला. दि.8 गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील मुख्य प्रवेशद्वारावर भारतीय सैन्य आणि भारत सरकारचे अभिनंदन करत " भारत माता की जय, जय हिंद, भारतीय सेना जिंदाबाद, वंदे मातरम आदी घोषणाबाजी करत आतषबाजी करत विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, माजी सरपंच कल्याण वाणी, विक्रांत वाणी, भगवान मोरे, दामोदर थोरात, विक्रम दाभाडे, गणपत तागड, संतोष भोसले, सुदाम मुळे, अ‍ॅड. गणेश वाणी, संजय घोलप, पांडुरंग वाणी, दादा गायकवाड, राजेभाऊ ढास, संजय सुकाळे, नितीन जाधव, शिवाजी शिंदे, शिवाजी रणखांब, बाजीराव दशमे, हरिओम क्षीरसागर आणि राम फाळके उपस्थित होते.

----------------------------------------

# दोन लाख 11 हजार कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप; बीड जिल्ह्यात सर्वाधिक




छत्रपती संभाजीनगर - मराठा आरक्षणाच्या आंदोलनानंतर कुणबी नोंदी शोधून प्रशासनाने प्रमाणपत्र द्यायला सुरवात केली. त्यानुसार मराठवाड्यात आतापर्यंत दोन लाख 11 हजार 672 जणांनी कुणबी प्रमाणपत्रे काढली आहेत. सर्वाधिक प्रमाण बीड जिल्ह्यात असून 1 लाख 41 हजार 905 जणांनी कुणबी प्रमाणपत्रे मिळवली आहेत. विभागीय आयुक्तालयातील सूत्रांकडून मंगळवारी (ता. सहा) ही माहिती देण्यात आली. मराठा आरक्षणाच्या आंदोलनादरम्यान युद्धपातळीवर प्रयत्न करून जुन्या नोंदी तपासण्याचे काम हाती घेण्यात आले होते. मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांमध्ये दोन कोटी 21 लाख 55 हजार 529 नोंदींची तपासणी करण्यात आली. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील 165 गावांमध्ये 4613 कुणबी नोंदी सापडल्या.

जालना जिल्ह्यातील 228 गावांत 5010, परभणीतील 161 गावांत 3781, हिंगोलीच्या 163 गावांत 4356, नांदेडमध्ये 105 गावांत 1750, बीडच्या 529 गावांत 22 हजार 515, लातूरच्या 41 गावांत 984 आणि धाराशिव जिल्ह्यात 117गावांतील 4786 नोंदी सापडल्या आहेत. सापडलेल्या नोंदींच्या आधारे कुणबी, कुणबी मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र देण्याला सुरवात झाली. **पान 3 वर**

## बीडमध्ये स्पा सेंटरच्या नावाखाली नको ते उद्योग, पोलिसांना कुणकुण, धाड टाकली अन्...



बीड शहरातील मध्यवर्ती भागात स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरु होता. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर बीड शहर पोलिसांनी स्पा सेंटरवर मोठी कारवाई केली आहे. ब्लीस स्पा नावाच्या सेंटरच्या तळघरात हा बेकायदेशीर प्रकार सुरु होता. कारवाई अंतर्गत पोलिसांना स्पा चालकाला बेड्या ठोकल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बीड शहरातील सारडा कॅपिटल परिसरात ब्लीस स्पामध्ये वेश्याव्यवसाय सुरु होता. स्पाच्या तळघरामध्ये मागील काही दिवसांपासून हा प्रकार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून काल (7 मे) रात्री 8 च्या सुमारास कारवाई केली. **पान 3 वर**

## बीड जिल्हा पोलीस पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

### अध्यक्षपदी अशोक दुबाले तर उपाध्यक्ष संघर्ष गोरे



बीड / प्रतिनिधी बीड जिल्हा पोलीस पतसंस्थेची निवडणूक गुरुवार दि.8 मे रोजी बिनविरोध पार पडली आहे. अध्यक्षपदी अशोक दुबाले, उपाध्यक्ष संघर्ष गोरे तर सचिवपदी ज्ञानेश्वर परळकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. विशेष म्हणजे सलग तिसऱ्यांदा अशोक दुबले **पान 3 वर**

## सद्गुरु बंकटस्वामीं महाराज यांनी संत वामनभाऊ आणि संत भगवान बाबा सारखे हिरे घडवले - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



बीड / प्रतिनिधी सद्गुरु बंकट स्वामीं महाराज यांनी संत वामनभाऊ आणि संत भगवान बाबा सारखे हिरे घडवले. तसेच लोक पावलेली वारकरी परंपरा पुनर्जीवित करण्यासह संप्रदायाला बळ देण्याचं काम स्वामी महाराज यांनी केले असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर यांनी केले.

श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाला भेट दिली असता ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, ह. भ. प. स्वामी प्रकाशानंद गिरीजी महाराज, ह. भ. प. किसन महाराज पवार, ह. भ. प. नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, दिनकरराव कदम, अरुण डाके, विलास बडगे, पोलीस पाटील नानासाहेब काकडे, राजाभाऊ शेळके, गदळे, भारत पप्पा काळे, यांच्यासह हजारो भावीक भक्त उपस्थित होते.

श्रीक्षेत्र नेकनूर येथे सुरु असलेल्या संत बंकट स्वामी महाराज यांच्या 81 व्या पुण्यतिथी उत्सवात आज माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट दिली यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्रात काकडा भजन, किर्तन परंपरेला समृद्ध करण्याचे श्रेय संत बंकस्वामी महाराज यांना जाते. ते जोग महाराज वारकरी **पान 3 वर**

## डॉ. झाकीर हुसेन उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात एच.एस.सी.परीक्षेत उज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न



परळी वै.( प्रतिनिधी): डॉ. झाकीर हुसेन उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्रचार्या पठाण मुनवरीबेगम हसन खान हे मंचावर उपस्थितीत होते. तसेच माध्यमिक विद्यालयाचे सह शिक्षक परवेज देशमुख सर, प्रा.शेख मुशीर अहेमद प्रा.सय्यद सबाहतअली सर, प्रा.शेख मसूद सर, प्रा. मोहमद आसरार सर, प्रा. पठाण फरहत बाजी, सरताज सर, युसूफ चाचा, व पालक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सय्यद सबाहत सर यांनी केले. त्यानंतर एच.एस.सी.बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त करत स्वतःसह उच्च माध्यमिक विध्यालायचे नावलौकिक करणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचा यावेळी पालकांसह सत्कार करण्यात आला. विज्ञान शाखेतून यावर्षी सर्व प्रथम येण्याचा मान कु. शेख झुफशा अहमद हिने विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण होत 76. 00 % प्राप्त केला. तर द्वितीय कु.शेख आयशा समद 73.67% व तृतीय कु.शेख **पान 3 वर**

## शिवाजीराव दादा पंडित यांनी घेतले श्री क्षेत्र भगवानगडाचे आशीर्वाद

### गडावर सुरु असलेले माऊली मंदिराचे भव्य बांधकाम पाहून व्यक्त केले समाधान




भगवानगड / प्रतिनिधी माजी मंत्री तथा बीड जिल्ह्यातील शिक्षण महर्षी म्हणून ओळख असलेले शिवाजीराव दादा पंडित यांनी वैशाख शुद्ध मोहिनी एकादशी निमित्त श्री क्षेत्र भगवानगडाचे आशीर्वाद घेतले. यावेळी भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री बाबांनी शिवाजीराव दादांना गडावर सुरु असलेल्या भव्य दिव्य श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या मंदिराची माहिती दिली.

श्री क्षेत्र भगवानगडावर महाराष्ट्रातील एकमेव असे तीन बाय तीन फूट दगडांमध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिराचे बांधकाम सुरु आहे. आळंदी नंतर श्री क्षेत्र भगवानगडावरच एवढे भव्य मंदिर सुरु आहे. वारकरी संप्रदायातील व संपूर्ण भारतातील वारकरी संप्रदायाचे पाईक भगवानगडावरील माऊलींच्या **पान 3 वर**

## बीड जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशनचा ढोंगीपणा उघड!

### जिल्हा परिषद सीईओंच्या उपस्थितीत बैठकी दरम्यान पाटोदा पंचायत समिती कार्यालयात गुडघाभर कचरा मग जिल्ह्यांची अवस्था काय?



पाटोदा / प्रतिनिधी केंद्र सरकारच्या "स्वच्छ भारत मिशन"अंतर्गत देशभरात स्वच्छता अभियान राबवले जात असतानाही प्रत्यक्षात या मोहिमेची अंमलबजावणी कागदावरच मर्यादित राहिल्याचे धक्कादायक चित्र पाटोदा तालुक्यात समोर आले आहे. पाटोदा पंचायत समिती कार्यालयात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक सुरु असताना कार्यालय व परिसरात गुडघाभर कचऱ्याचे ढीग पडलेले होते. या प्रकारामुळे संपूर्ण तालुक्याच्या स्वच्छतेबाबत प्रशासन किती गंभीर आहे, याचे वास्तव चव्हाट्यावर आले आहे. बैठकीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

जे ठिकाण विकासाच्या निर्णयांचा केंद्रबिंदू आहे, तिथेच अशी अस्वच्छता असेल तर तालुक्याच्या इतर गावांमध्ये काय परिस्थिती असेल, हा प्रश्न उपस्थित होत असून गावोगावात कचरा, पण व्यवस्था कुठे? **पान 3 वर**

## पाण्यासाठी तरसवणाऱ्या बीड नगरपरिषद प्रशासना विरोधात असलेल्या हंडा मोर्चात उपस्थित रहा - ॲड. संध्याताई राजपूत



बीड / प्रतिनिधी शहराला कधी नव्हे ते अभुतपूर्व पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असून मागील एक महिन्यापासून शहराचा पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झालेला असून शहरातील नागरिकांना स्वतःच्या खिशाचे पैसे खर्च करून पाणी विकत घ्यावे लागत आहे .त्यामुळे शहरातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

तसेच सर्वसामान्य गोरगरीब नागरिक पाणी घेऊ शकत नाहीत ते दारोदारी पाण्यासाठी फिरत असल्याचे चित्र शहरात सध्या दिसत असून ,पाणी नसल्यामुळे शहरातील नागरिक महिला लेकीबाळी रात्री अपरात्री पाण्यासाठी वन-वन फिरताना दिसत आहेत. नगर परिषदेच्या ढिसाळ व नियोजन शून्य कारभारामुळे शहरातील नागरिकांना संकटाचा सामना करावा लागत आहे. यामुळे शहरातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष व संताप निर्माण झालेला आहे. त्यामुळे **पान 3 वर**

## चि.गुरुप्रसाद रेवननाथ यादव याचे 88.17% गुण घेऊन बारावी परीक्षेत घवघवीत यश.



थर्मल परळी वैजनाथ मधील बारावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी चि. गुरुप्रसाद रेवन्नाथ यादव यांनी बारावी परीक्षेत 88.17% गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले. गुरुप्रसाद च्या या यशाबद्दल परळी येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय संस्थेचे अध्यक्ष, प्राचार्य ,प्राध्यापक यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत **पान 3**

## साडे दहा वाजले तरी पंचायत समिती कार्यालयाचे दरवाजे बंदच,

### अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मनमानी कारभाराचा नागरिकांना त्रास



परळी ( रानबा गायकवाड) शासकीय कार्यालये आणि कर्मचारी यांनी वेळेवर कामावर यावे असा सक्त कायदा आहे. पण या कायद्याला धाब्यावर बसविण्याचे काम परळी पंचायत समितीचे अधिकारी आणि कर्मचारी करतांना दिसत आहेत. सकाळचे साडे दहा वाजले तरी पंचायत समिती कार्यालयाचे दरवाजे बंदच असल्याचा पुरावाच जनतेसमोर आलेला आहे.

आज सकाळी साडेदहा वाजता परळी पंचायत समिती कार्यालयाचे बाहेरील मुख्य गेट तसेच इमारतीचे मुख्य दरवाजा उघडलेला होता. परंतु आत मध्ये गेल्यानंतर तीन्ही मजल्यावरचे जवळपास सर्वच दरवाजे बंद दिसत होते. ना अधिकारी ना कर्मचारी. कर्मचारीच नाहीत म्हटल्यावर सामान्य नागरिक तरी आत मध्ये कोणाला भेटणार. आणि कार्यालयात कशाला जाणार. **पान 3 वर**

## मागण्या मान्य न केल्यास वंचित बहुजन आघाडीचे 14 मे पासून अंबाजोगाई नगर परिषद कार्यालयात बेमुदत धरणे आंदोलन



बीड प्रतिनिधी दिनांक 08/05/2025 रोजी वंचित बहुजन आघाडीने शहरातील नागरिकांच्या विविध समस्या घेऊन नगर परिषद कार्यालयास बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला.

या निवेदनात वंचित बहुजन आघाडीने अंबाजोगाई शहरातील विविध समस्या बाबत नगर परिषद अंबाजोगाई प्रशासनास आम्ही वेळोवेळी निवेदन व पाठपुरावा करत संबंधित खालील विभाग प्रमुख व प्रशासकीय अधिकारी यांना सूचित करत त्या समस्या सोडविण्यासाठी निवेदने सादर केली , परंतु संबंधित विभाग व अधिकारी यांच्याकडून दखल न घेता टाळाटाळ केल्या कारणाने आम्ही आंदोलन करण्याचा निर्णय घेत असल्याचे सांगितले . जोपर्यंत सर्व मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही याची नोंद घेत प्रशासनास पी टी आर नोंदणी, डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका केंद्र सुरु करणे, कंत्राटी सफाई कामगारांचे थकीत वेतन अदा करणे, शासकीय कर्मचारी यांचे वेतन अदा करणे, दिव्यांगांचा 5 टक्के राखीव निधी लाभार्थ्यांना **पान 3 वर**

## मंत्री पंकजाताई यांना मंत्री पद भेटण्यासाठी त्याग करणाऱ्या ज्ञानोबा बडे यांना युवा भाजपा तालुका अध्यक्ष पद भेटणार का ?




धारूर ( बाबुराव तिडके ) इ स 2019 पासुन मंत्री पंकजाताई यांचे राजकिय पुणर्वसन व्हावे ताई आमदार व्हाव्यात मंत्री असाव्यात म्हणून त्यांनी पण केला होता की ताई साहेब जो पर्यंत आमदार मंत्री होणार नाहीत तो पर्यंत मी पायात काहीही पायथान घालणार नाही गेली सहा वर्षा पासुन ज्ञानोबा बडे पायात चप्पल न घालता अणवाणी फिरत होते सहा वर्षाणी राजकिय अकाशवाणी होऊन ताई आमदारही झाल्या मंत्री ही झाल्या ज्ञानोबा बडे यांचा पण तडीस जाऊन खरा ठरला अश्या या मुंडे घराण्याशी एकनिष्ठ असणाऱ्या व वीस वर्षा पासुन भाजपाचे सक्रिय काम करणाऱ्या सच्चा भाजपा कार्यकर्त्याला धारूर तालुक्याचे भाजपा युवा अध्यक्ष पद देणार का डॉ स्वरूपसिंह हजारी साहेब यांनी स्वःता लक्ष घालून निष्ठावंत ज्ञानोबा बडे यांना युवा तालुका अध्यक्ष पद देणे गरजेचे आहे कै महादेव ( अण्णा ) बडे यांचा विश्वासु व निष्ठावंत ज्ञानोबा बडे असल्याने त्यांना पद दिले तर ( अण्णा ) देखिल स्वर्गातुन फुले उधळुन या लाडक्या कार्यकर्त्याचे कौतुक करतील धारूर तालुक्यातील अनेक सरपंच पदाधिकारी कार्यकर्ते श्री ज्ञानोबा बडे यांनाच युवा भाजपा धारूर

## गुरुकृपा इन्स्टिट्यूट ची यशाची परंपरा कायम



माजलगाव / प्रतिनिधी :- महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ अँड सायन्स यांची हिवाळी परीक्षा 2025 फेब्रुवारी महिन्यात पार पडली यामध्ये दरवर्षीप्रमाणे फिजिओथेरपी चा निकाल लागला आणि यावेळीही गुरुकृपा इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी या निकालामध्ये बाजी मारली थर्ड इयर 100%, सेकंड इयर 80%, तर फर्स्ट इयर 60% असा निकाल लागला या निकालामध्ये प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला थर्ड इयर मध्ये अनुक्रमे गौरव वसंत मोरे (प्रथम), सरस्वती संजय जगताप (द्वितीय) तसेच शामल संजय चव्हाण (तृतीय) यांनी बाजी मारली त्यांच्या पाठीवर कौतुबाबतची थाप **पान 3 वर**

## लिंबागणेश येथे ऑपरेशन सिंदूर विजयाचा जल्लोष



लिंबागणेश / प्रतिनिधी 22 एप्रिल जम्मू कश्मीर येथील पहलगाम या ठिकाणी पाक धार देण्यात दहशतवाद्यांनी 26 निष्पाप भारतीय पर्यटकांची निर्घृणपणे हत्या केली होती. पहलगाम हल्ल्यातील पीडितांना न्याय देण्यासाठी" ऑपरेशन सिंदूर "अंतर्गत भारतीय सैन्य दलांनी लढाऊ विमाने आणि ड्रोनद्वारे क्षेपणास्त्राचे हल्ले करण्यात आले. या कारवाईत जैश -ए-मोहम्मद, लष्कर -ए-तोयबा, हिजबुल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनांची युवकांची भरती, त्यांचे प्रशिक्षण, दहशतवाद्यांना भारतामध्ये घुसवण्यासाठी " लॉन्चिंग पॅड" म्हणून वापरात येत असलेल्या काश्मीरमधील 5 आणि पाकिस्तान मधील 4 अशा एकुण 9 तळ जे गेल्या 3 दशकांपासून भारत विरोधी **पान 3 वर**